# <u>उत्सव जन्माचा</u>

'लाडक्या राणीचे पुरवा डोहाळे.....'

....................

'दिवस तुझे हे फुलायचे....'

....................

एकावर एक वैशुच्या डोहाळेजेवणाची गाणी सुरू होती. तिच्याकरता खास झोपाळा बनऊन घेतला होता. मोगरीच्या शुभ्र फुलांची आरास मोहवत होती. मैत्रीणी खिदळत होत्या. आत्या-मावश्यांची कौतुक भरली धावपळ सुरू होती. आई डोळेभरून लेकीकडे पहात होती. वैशुच्या भावात अन् नव-यात कोण जास्त छान अँगलनी फोटो काढतोय याची चढाओढ चालू होती. अवघडलेली वैशु हा सगळा सोहळा मनापासून 'enjoy' करत होती. अधुन-मधुन तिच्यावर 'प्रेमळ' सुचनांचा मारा चालू होता 'अग जरा हळु!' 'जपून' 'ही उशी घे' 'नीट टेकून बस'.

हे सगळ बघता-बघता माझ्या डोळयासमोर मात्र काही वर्षापूर्विचा प्रसंग अगदी काल घडल्यासारखा तरळत होता.

मार्च महिन्यातला तो दिवस होता. महाशिवरात्र आल्यामुळे office ला सुट्टी होती. सकाळ अगदी निवांतपणे सरकत होती. माझा आठ वर्षाचा मुलगा बाहेरची गंमत बघत गॅलरीत बसला होता. आमच्या गॅलरीच्या समोरच एक मोठ्ठा रिकामा प्लॉट आहे. आदल्या रात्रीपासून तिथे भटक्या लोकांचा तळ पडला होता. ऊघडयावरच त्यांचे रोजचे व्यवहार चालू होते. अधुन-मधुन भांडणसदृष्य बोलण्याचे आवाज येत होते. कुठल्या अगम्य भाषेत बोलत होते कुणास ठाऊक!

अचानक माझ्या मुलाच्या जोरजोरात हाका यायला लागल्या -

'आई लवकर ये. काय झालय बघ. कुणाला तरी साप चावला. लवकर ये.'

त्याची आरडा-ओरड ऐकून मी धावतच गॅलरीत गेले. प्लॉटजवळच्या भिंतीलगत कित्येकदा तरी आम्ही मोठे-मोठे दोन साप बघितले होते. बापरे चावले की काय कुणाला ? मी वाकून-वाकून बघायला लागले. समोरच्या कोंडाळयात सगळाच कलकलाट चालू होता. पोर-सोर , बाया-बापडया सगळेच तारस्वरात काहीतरी चित्र-विचित्र बोलत होते. काही वेळ असाच गेला. मग

एक पोरगेलासा माणूस जरा बाजूला झाला अन् हातातल्या खुरप्याने त्याने भिंतीजवळ खड्डा खणायला सुरवात केली. त्याचा दोन हात ऊंचीचा खड्डा खणून झाला अन् एक साडी गुंडाळलेली बाई, बाई कसली, जेमतेम पंधरा-सोळा वर्षांची पोरगीच ती, तिथे येऊन ऊताणी झोपली. खड्डा खणणारा पोरगा जरा दूर जाऊन एका दगडावर टेकला. बाकीच्या बाया-बापड्या आपापल्या चुली-गठुड्यां जवळ येऊन निवांत कामाला लागल्या. चार-सहा बारकी-बारकी पोर मात्र अधुन-मधुन त्या पोरीजवळ जाऊन तिची साडी वर करून पहात होते. असाच अर्धा—एक तास गेला. आता दगडावर टेकलेला पोरगा ऊठला - तो बहुतेक त्या पोरीचा नवरा असावा - त्याने तिच्या पोटावर लाथा मारायला सुरवात केली. त्याने एक दहा-बारा लाथा मारल्या न् मग एक पोक्तशी बाई, जी आत्तापर्यंतं निवांतपणे चुल-बिल पेटवत बसली होती पुढे झाली. ती खड्ड्याजवळ जाऊन वाकून ऊभी राहिली अन् पुढच्या पाच-सात मिनीटात तिच्या हातात एक गोरपान बाळ आल. तोवर चुलीवरच पाणी तापल होत. त्या बाईने लगेच बाळाला आंघोळ घातली. ऊघड्यावरच ती पोरगीही सावकाशपणे आंघोळीला बसली. हे होतय तोवर तिच्या नव-याने चार बांबू ऊभारून त्यावर एक ठिगळांच लुगड टाकल. त्या सावलीला बाळ-बाळंतीण जाऊन झोपले.

संध्याकाळी दोन-चार पोर कॉलनीत फिरतांना दिसली. ‘तायला प्वॉर झाल , भाकरी वाडा’ एवढच बोलण कळत होत.

दुस-या दिवशी जरा लवकरच ऊठून बाहेर नजर टाकली. सगळे गाठोडे मडके आवरल्या गेले होते. निम्मे लोक रस्त्यालाही लागले होते. त्यातच काखोटीला पोर घेतलेली ती ‘पोर’ ही होती. एक दिवस ऊन-ऊन पाण्याची आंघोळ अन् निवा-याला चार घटका ठिगळांची सावली हेच ‘तिच’ बाळंतपण.

अन् हो त्या वर्षी महाशिवरात्रीचा दिवस होता आठ मार्च, **‘women’s day’ !**

—शर्मिला रणदीवे